Vol. 7, Issue 4, January 2018 ISSN 2249-894X

# REVIEW OF RESEARCH

*An International Multidisciplinary Peer Reviewed & Refereed Journal*

**Impact Factor: 5.2331**

**UGC Approved Journal No. 48514**

**Chief Editors**
Dr. Ashok Yakkaldevi
Ecaterina Patrascu
Kamani Perera


**Associate Editors**
Dr. T. Manichander
Sanjeev Kumar Mishra

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# कोकणातील विकसनशील औदयोगिक विकास प्रकियेचे अध्ययन

डॉ. सुरेश सिताराम नाळे
आय.सी.एस. महाविदयालय खेडता. खेड जि. रत्नागिरी.

## 1. प्रस्तावना :



भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही भारतातील दोन तृतीयांशापेक्षा अधिक लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात. या बहुसंख्य लोकांच्या उपजिवीकेचे व रोजगार पुरविण्याचे साधन म्हणून शेती व तिच्याशी निगडीत व्यवसायांकडे पाहिले जाते. असे असले तरी कोणत्याही देशाच्या स्थायी आणि निरंतर विकासासाठी फक्त शेती क्षेत्रावर अवलंबून राहून चालत नाही. कारण हे सिद्ध आहे की, औदयोगिक विकास आणि आर्थिक वृद्धी यामध्ये घनिष्ट आणि सकारात्मक संबंध आहे. भारताच्या बाबतीत शेती क्षेत्राचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा स्वातंत्र्योत्तर काळात वेगाने कमी होत आहे. परंतु त्यामानाने शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या मात्र कमी होत नाही. म्हणूनच भारताने दुस-या पंचवार्षिक योजनेपासून उदयोगधंदयाच्या विकासाला योजनेत महत्वपूर्ण स्थान दिले आहे.

शेती आणि उदयोग हे एकमेकांना पूरक असून अनेक बाबींसाठी ते एकमेकांवर अवलंबून आहेत. परस्परांच्या सहकार्याने दोन्हीही क्षेत्रे विकसित होऊन देशाच्या स्थायी विकासाला मोठी मदत होते. देशाच्या वाढत्या औदयोगिकीकरणाचे अनेक लाभ होतात. यामध्ये विकसित व विकसनशील देशांच्या दरडोई उत्पन्नातील दरी कमी होण्यास मदत होते, शेती क्षेत्रात प्रकर्षाने आढळणा-या प्रछन्न बेकारीवर उपाययोजना करणे, शेती व मुलभूत सेवांचा विकास होणे आणि एकूण रोजगारात वाढ होणे इ. चा समावेश होतो. याशिवाय वाढत्या उत्पादन फलाचे लाभ मिळणे, नैसर्गिक साधनसामग्रीचा अधिकाधिक व पर्याप्त वापर करणे, देशाची निर्यात वाढविणे, भांडवल निर्मितीचा दर वाढविणे इ. लाभ मिळवून देण्यात औदयोगिक क्षेत्राची भूमिका महत्वाची असते.

आर्थिक विकासासाठी औदयोगिकीकरण आणि उदयोगाचा विकास करण्यासाठी दि. ६ एप्रिल १९४८ या दिवशी भारत सरकारने पहिले औदयोगिक धोरण जाहीर कले. या धोरणातून मिश्र अर्थव्यवस्थेचा पाया रचला. आवश्यक असतील तेथे उदयोग सुरू करावेत तसेच खाजगी क्षेत्राच्या विकासाला प्रोत्साहन दयावे अशी अपेक्षा सरकारकडून करण्यात आली. या औदयोगिक धोरणात युद्ध साहित्य निर्मिती, अणू ऊर्जा, रेल्वे हि तिन उदयोग सरकारी मक्तेदारीचे होते. काही उदयोगांचे राष्ट्रीयीकरण केले असून काही उदयोग खाजगी क्षेत्रात ही सुरू केले. १९५६ साली सरकारने दुसरे औदयोगिक धोरण जाहीर केले. यात अवजड पायाभूत, लघूउदयोग व ग्रामिण उदयोगांच्या विकासाला चालना दिली.

माजी पंतप्रधान स्व. श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने २४ जुलै १९९१ रोजी भारतीय औदयोगिक क्षेत्रात क्रांती घडवून आणणारे नविन औदयोगिक धोरण जाहीर केले. १९४८ व १९५६ च्या औदयोगिक धोरणापासून पूर्णतः वेगळे असे धोरण १९९१ मध्ये मांडले. या नविन धोरणानुसार परवाना पद्धतीने निर्मुलन करून फक्त आवश्यक उदयोगांसाठीच परवाना आवश्यक करण्यात आला. मक्तेदारी नियंत्रण कायदा करून परकीय भांडवल गुंतवणूकीची मर्यादा ५१ः पर्यंत वाढवण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील उदयोगांची

भूमिका व त्यांची मक्तेदारी यांना आमुलाग्र बदल करण्यात आला.

भारताच्या औदयोगिक रचनेमध्ये विविध प्रकारचे उदयोग आढळतात. त्यांची विभागणी प्रामुख्याने अति मोठे उदयोग, मध्यम उदयोग, सहाय्यकारी उदयोग, लघु उदयोग, लघुत्तम उदयोग व कुटीर उदयोग अशी केली जाते. या उदयोगांची यंत्र व संयंत्रांतील गुंतवणूकीनुसार १९९९७ – १९९८ च्या वार्षिक औदयोगिक सर्वेक्षणात पुढीलप्रमाणे विभागणी केली होती.

*1. अति मोठे उदयोग* (Very Large Industries):– ज्या उदयोगांच्या यंत्र आणि संयंत्राचे मूल्य १०० कोटी रूपयांपेक्षा अधिक आहे अशा उदयोगांचा समावेश अति मोठे उदयोग या संकल्पनेत होतो.

*2. मोठे उदयोग* (Large Industries) :– ज्या उदयोग संस्थांच्या यंत्र आणि संयंत्राचे मूल्य १० कोटी रूपयांपेक्षा अधिक आहे मात्र १०० कोटी रूपयांपेक्षा कमी आहे त्यांचा समावेश मोठे उदयोग या संकल्पनेत होतो.

*3. मध्यम उदयोग* (Medium Industries) :– ज्या उदयोगात स्थिर भांडवल गुंतवणूक ही १ कोटी रूपये ते १० कोटी रूपये पर्यंत आहे असे मध्यम उदयोग मोडतात.

*4. सहाय्यक उदयोग* (Ancillary Industries) :– जे लघुउदयोग आपल्या उत्पादनापैकी ५०: किंवा त्यापेक्षा अधिक उत्पादन इतर उदयोगांना विकतात त्या उदयोगांना सहाय्यक उदयोग म्हणतात.

*5. लघु उदयोग* (Small Scale Industries):– ज्या उदयोगात स्थिर भांडवल गुंतवणूक ५ लाख रूपयांपेक्षा अधिक परंतू १ कोटी रूपयांपेक्षा कमी आहे असे उदयोग या संकल्पनेत मोडतात.

*6. लघुत्तम उदयोग* (Tiny Industries):– इस २००० च्या व्याख्येनुसार ज्या उदयोगातील स्थिर भांडवल गुंतवणूक २५ लाख रूपये पर्यंत आहे अशा उदयोगांना लघुत्तम उदयोग असे म्हणतात.

*7. कुटीर उदयोग* (Cottage Industries):– १९४९ – १९५० च्या फिस्कल कमिशनच्या मते, कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने पूर्णकालीन किंवा अंशकालीन व्यवसाय म्हणून चालविण्यात येणा–या उदयोगाला कुटीर उदयोग म्हणतात.

कोकण औदयोगिक विभाग हा महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील एक मोठया औदयोगिक विभागापैकी एक नावाजलेला विभाग आहे. या विभागात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्हयांचा समावेश आहे. हा विभाग विकसनशील विभाग आहे. या विभागाचा जलद विकास होऊ शकतो. कारण कोळसा यंत्र सामुग्री, कच्चामाल यांची आयात करण्यात मुंबई बंदराची सोय आणि कोकणातून भरपूर व स्वस्त मजूरांची उपलब्धता होवू शकते. या विभागात तेल शुध्दीकरण, रसायने, इंजिनिअरिंग वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, औषधे, खते इ. वस्तू निर्माण करणा–या कारखान्यांचा समावेश आहे. ठाणे जिल्हयात कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, तारापूर, डहाणू, वाडा या ठिकाणी औदयोगिक वसाहती असून रायगड जिल्हयात पनवेल–अलिबाग, रोहा–नागोठणे, महाड या ठिकाणी औदयोगिक वसाहती असून रत्नागिरी जिल्हयात चिपळून, दापोली, गाणे, खेर्डी, रत्नागिरी येथे औदयोगिक वसाहती असून सिंधुदुर्ग जिल्हयात कुडाळ, उदयमनगर या ठिकाणी औदयोगिक वसाहती आहेत. याशिवाय कोकणातील याच विभागात भात व विविध प्रकारची फळांचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असून प्रामुख्याने फळांवर प्रक्रिया करणारे कारखाने आहेत.

## 2. उद्दिष्टे :

१. उदयोगांच्या विकासासाठी आवश्यक असणा–या मुलभूत सोयी – सुविधा आणि आधारभूत संरचनांचा आढावा घेणे.

२. औदयोगिक भागातील उदयोजकांच्या वर्तमानकालीन समस्यांचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना मांडणे.

३. उदयोग उभारणीसाठी शासनकाडून अमलात आणल्या जाणा–या योजनांचे मुल्यमापन करणे.

४. उदयोजक व कामगार यांतील हितसंबंधाचा अभ्यास करणे.

५. औदयोगिक विकासासाठी आवश्यक असणारी शासकी यंत्रणा, वित्तसंस्था, बँका इ. मध्ये योग्य समन्वय आहे कि नाही याचा अभ्यास करणे.

### *3. गृहितकृत्ये :*

१. औदयोगिक विकासाच्या दृष्टिने उदयोजक, कामगार, शासकीय यंत्रणा, वित्तसंस्था, बॅंका या घटकांत योग्य समन्वय आहे.

२. केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांद्वारे औदयोगिक विकासासाठी मुलभूत सोयी, सुविधा पुरविल्या जात असल्या तरी विकसनशील विभागात काही उदयोग आजारी आहेत.

३. विकसनशील विभागातील औदयोगिक वसाहतीमधील उदयोगांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

४. संशोधन पद्धती – तथ्य संकलन :प्रस्तूत संशोधन प्राप्त तथ्यांच्या आधारे सखोल अध्ययनावर आधारित आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे.

*1. प्राथमिक स्त्रोत :* यात प्रामुख्याने प्रश्नावली या स्त्रोताचा वापर केला आहे. उदयोजकांकडून पुर्वनियोजीत प्रश्नावलीच्या आधारे वस्तुनिष्ठ माहिती गोळा केली.

*2. दुय्यम स्त्रोत :* दुय्यम स्त्रोताद्वारे माहिती संकलनासाठी उदयोग, औदयोगिक विकास, लघुमध्यम – मोठे उदयोगांवर आधारित संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, आर्थिक सामाजिक सर्वेक्षण, भारत व महाराष्ट्राची आर्थिक सर्वेक्षणे, उदयोगांशी संबंधित प्रकाशित व अप्रकाशित संशोधने याशिवाय मासिके, त्रैमासिके, साप्ताहिकांमधील विविध लेख, वर्तमानपत्रातील महत्वाच्या बातम्या, इंटरनेट वरील उपलब्ध माहितीचा वापर केला आहे.

### *5. उपाययोजना / शिफारसी :*

१. कोकणातील उदयोजकांना उदयोगांच्या वाढीसाठी मुलभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

२. उदयोगांना कच्च्या मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

३. कोकणातील उदयोगांच्या स्थापनेत लोकप्रतिनिधींनी विरोध करू नये.

४. स्थानिक व घाटावरचे असा भेदभाव करू नये.

५.औदयोगिक वसाहतींच्या परिसरात अभियांत्रिकी महाविदयालये सुरू करणे यामुळे, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता होईल.

६. सरकारने आपल्या औदयोगिक धोरणात कोकणातील मागासलेल्या तालुक्यात उदयोग सुरू करण्यास प्राधान्य दयावे. उदयोजकांना विविध सवलती दयाव्यात.

७. मुंबई आणि ठाणे या शहरी भागात उदयोगांचे होणारे केंद्रिकरण कमी करून ग्रामीण भागात उदयोगांचे विकेंद्रिकरण घडवून आणण्यास धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

### *6. संदर्भ सूची :*

१.Cyril smith (1928) Industrial Participation, McGraw-Hill Book Company (UK) Limited.

२.Dutta R. Sundharm (2006) Indian Economy, S. Chand and Sons Co. New Delhi.

३.Pattanaik S.M. (1998) Development Strategy for Small Industries, Himalaya Publishing House, Bombay.

४.आगलावे प्रदिप (२०००), संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, विदया प्रकाशन, नागपूर

५.खुरूद. भा.शं. (१९९५), जिल्हा उदयोग केंद्र आणि लघु उदयोगांचा विकास, अर्थसंवाद, जुलै – सप्टेंबर १९९५

६.घाटोळे रा.ना. (१९८५), समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पद्धती श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

७.महाराष्ट्राची आर्थिक – सामाजिक पाहणी २०१५ – १६

### Websites -

1) www.Udyog.com/policies/lip.htm

2) www.maharashtra.gov.in